**जलयुक्त शिवार अभियान या कार्यक्रमांतर्गत**
**पावसाळ्यामध्ये वृक्ष लागवड करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**जलसंधारण विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः जशिअ २०१५/प्र.क्र. २६४ /जल ७,**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख: १० जून, २०१५.

**शासन परिपत्रक -**

"सर्वांसाठी पाणी टंचाईमुक्त महाराष्ट्र" ह्या कार्यक्रमांतर्गत टंचाई परिस्थितीवर कायम स्वरुपी मात करण्यासाठी राज्यात **जलयुक्त शिवार अभियान** हा अत्यंत महत्त्वाकांक्षी कार्यक्रम राबविण्यात येत असून सदर कार्यक्रम राज्य शासनाचा **Flagship** कार्यक्रम म्हणून राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत दरवर्षी ५००० गावे टंचाईमुक्त करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आलेले आहे. त्यानुसार सन २०१५-१६ मध्ये टंचाईमुक्त करण्याकरिता ६००० गावांची निवड करण्यात आली असून या गावांमध्ये शासन निर्णय, दिनांक ५ डिसेंबर २०१४ मधील सूचनांनुसार कामे सुरु आहेत. जलयुक्त शिवार अभियान या कार्यक्रमांतर्गत निवडलेल्या गावांमध्ये हाती घ्यावयाचे उपचार प्राधान्याने पावसाळा सुरु होण्यापूर्वी म्हणजेच सर्वसाधारणपणे जून अखेरपर्यंत पूर्ण करावयाची असून त्या दृष्टीने सर्व यंत्रणांना आवश्यक त्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. वृक्ष लागवडीस प्रोत्साहन देऊन वृक्ष लागवड करणे हादेखील या अभियानाचा महत्त्वाचा घटक आहे.

२. लोकनेते कै.गोपीनाथजी मुंढे यांच्या स्मरणार्थ वृक्ष लागवडीचा मोठा कार्यक्रम दि.३ ते १० जून २०१५ या कालावधीत घेण्यात आलेला आहे. या मोहिमेचा कालावधी वाढविण्याची मागणी जनतेकडून करण्यात आल्याने लोकांच्या मागणीनुसार सदर योजनेचा कालावधी जून अखेरपर्यंत वाढविण्यात येत आहे. तसेच या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग घेण्याचे निदेश देण्यात येत आहेत. सबब, जलयुक्त शिवार अभियान या कार्यक्रमांतर्गत टंचाईमुक्त करण्यासाठी निवडलेल्या गावांमध्ये प्रत्येक गावात किमान ५००० रोपे लावण्याचे (वृक्ष लागवडीचे) उद्दिष्ट निश्चित करण्यात येत असून या लागवडीपैकी **५०% वृक्ष लागवड ही फळझाडांची लागवड** करण्याचे उद्दिष्ट देण्यात येत आहे. जिल्हाधिकारी यांनी सर्वसंबंधित यंत्रणांना त्यानुसार रोपे उपलब्ध करुन देण्याचे व वृक्ष लागवडीबाबत आवश्यक त्या सूचना

संबंधितांना तात्काळ देऊन पावसाळा सुरु असताना **प्रत्येक निवडलेल्या गावात वरीलप्रमाणे सूचनांनुसार किमान ५००० वृक्ष लागवड करण्याची कार्यवाही करण्यात येईल, याबाबत सर्वोतोपरी दक्षता घ्यावी.**

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०६१०१७२४५०५७२६ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vinod S Wakhare

Digitally signed by Vinod S Wakhare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8f4277e1c48d95adb75a5d959bbb8f12b61892a0bf91d9d7250d0bfd4f204c77, cn=Vinod S Wakhare
Date: 2015.06.11 16:10:50 +05'30'

**( वि.सि.वखारे )**

उप सचिव महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव.
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव.
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/ विधान परिषद,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५. सर्व सन्माननीय विधानसभा/ विधान परिषद व संसद सदस्य.
६. मा.मंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव.
७. मा.राज्यमंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव.
८. सर्व मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
९. अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव , मंत्रालय, मुंबई.
११.अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन), मंत्रालय, मुंबई.
१२. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे-४११ ००१.
१३.विभागीय आयुक्त पुणे, नाशिक, औरंगाबाद व अमरावती.
१४.संचालक (मृदसंधारण), कृषि आयुक्तालय, पुणे-४११ ००१.
१५.मुख्य अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण), पुणे.

१६.प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१७.संचालक, महाराष्ट्र सुदूर सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
१८. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
१९.मुख्य कार्यकारी अधिकारी/ अप्पर मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा,पुणे.
२०.महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दीकरीता).
२१.जिल्हाधिकारी, पुणे/ सातारा/सांगली/ सोलापूर / नाशिक / अहमदनगर / धुळे / औरंगाबाद /परभणी /नांदेड / उस्मानाबाद / लातूर व जालना.
२२.मुख्य कार्यकारी अधिकारी / अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे/ सातारा/सांगली/ सोलापूर / नाशिक / अहमदनगर / धुळे / औरंगाबाद /परभणी /नांदेड / उस्मानाबाद / लातूर व जालना.
२३. महालेखापाल ½, महाराष्ट्र राज्य , मुंबई/ नागपूर (लेखा परीक्षा व लेखा व अनुज्ञेयता).
२४.अधिकदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२५.निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
२६.उपायुक्त (विकास) , विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे , नाशिक, औरंगाबाद व अमरावती
२७.विभागीय कृषि सहसंचालक, पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ लातूर व अमरावती
२८. अधिक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ, नाशिक/पुणे/औरंगाबाद व अमरावती
२९.जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, पुणे/ सातारा/सांगली/ सोलापूर / नाशिक / अहमदनगर / धुळे / औरंगाबाद /परभणी /नांदेड / उस्मानाबाद / लातूर व जालना.
३०.कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) पुणे/ सातारा/सांगली/ सोलापूर / नाशिक / अहमदनगर / धुळे / औरंगाबाद /परभणी /नांदेड / उस्मानाबाद / लातूर व जालना.
३१.जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे/ कोल्हापूर/ सातारा/ सोलापूर/ जळगांव/ बीड / लातूर व जालना.
३२. सर्व मंत्रालयीन विभाग
३३.सर्व सह सचिव / उप सचिव / अवर सचिव/ कार्यासन अधिकारी, ग्रा. वि. व ज. सं. विभाग, मंत्रालय, मुंबई.
३४.नियोजन विभाग/ वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
३५.कार्यासन जल-११ ग्रा. वि. व ज. सं. विभाग मंत्रालय, मुंबई.
३६.जल-७, निवड नस्ती.